# विचार आणि दर्शन

Translation of chapter 4 "Thought and perception" from the book "The limits of thought discussions" by Jiddu Krishnamurti and David Bohm, Routledge, 1999.

Translated by Padmakar Dabholkar (pvdabs@gmail.com), August 2015

Last updated: August 28, 2016

जे. कृष्णमूर्ती (कृ): मानवाने विचाराला एवढं प्रचंड महत्त्व का दिल आहे?

डेव्हिड बोम (डे): तुम्ही दाखवून दिलं आहे की विचार अनेक दृष्टीने सुरक्षितता देतो. केवळ मानसिक सुरक्षिततेच्या दृष्टीने नव्हे परंतु भौतिक सुरक्षितता सुध्दा.

कृ: होय. विचार स्वतः सुरक्षित नसतो.

डे: विचार सुरक्षित असू शकत नाही. तो एक केवळ प्रतिसाद असतो.

कृ: होय. म्हणून तो स्वतःमध्येच सुरक्षित असू शकत नाही. आणि बाहेर सुरक्षितता शोधतो.

डे: परंतु तो सुरक्षितता का शोधतो?

कृ: कारण विचार सतत बदलत असतो, सतत गतीशील असतो.

डे: परंतु तो तसेच राहण्यामध्ये समाधानी का राहत नाही हे त्यामुळे स्पष्ट होत नाही.

कृ: कारण तो स्वतःचे नाशवंत स्वरूप पाहत असतो.

डे: मग त्याला अविनाशी अवस्था का हवी असावी?

कृ: कारण अविनाशी अवस्था त्याला सुरक्षित वाटते.

डे: 'मी असुरक्षित आहे, मी अनित्य आहे' असे म्हणून जर विचार समाधानी राहिला, तर ते निसर्गासारखे असेल. तो फक्त म्हणेल, 'आज मी इथे आहे आणि उद्या मी निराळा असेन.'

कृ: अर्थातच. परंतु त्याने माझं (विचाराचं) समाधान झालेलं नाही. ते आसक्तीमुळे असेल का?

डे: परंतु आसक्ति म्हणजे नेमकं काय? विचार कुठल्याही गोष्टीला स्वतःला का चिकटून घेतो? तो असं का म्हणत नाही, 'मी फक्त विचार आहे, मी फक्त प्रतिसाद आहे'

कृ: परंतु तुम्ही विचाराला बरीच बुध्दीमत्ता प्रदान करत आहात. जर त्याने म्हटलं, "मी फक्त निसर्गासारखा आहे, मी फक्त येतो आणि जातो, सतत हालचाल करीत असतो..."

डे: आता तुम्ही जर असं म्हणत आहात की विचार यंत्रवत असतो, म्हणून तो असं करत असतो; तर मग हा यंत्रवत विचार अनिवार्यपणे सुरक्षितता का शोधत असतो ते आपल्याला पाहिल पाहिजे. यंत्र कशामध्येही काही विशिष्ट गोष्ट शोधत नाही. आपण यंत्र चालू करतो आणि ते चालू राहते.

कृ: अर्थातच. जोपर्यंत त्याला ऊर्जा मिळत जाईल तोपर्यंत ते काम करत राहील.

डे: जर ते बिघडलं तर तोच त्याचा शेवट असतो.

कृ: परंतु विचाराला समजतं का की तो यांत्रिकपणे काम करतो?

डे: नाही. परंतु विचाराने एक चुक केली आहे, त्याच्या आशयामध्ये काहीतरी गफलत झालेली आहे, म्हणजे विचाराला माहीत नसतं की तो यांत्रिकपणे काम करीत असतो. परंतु त्याचा अर्थ असा आहे का की विचाराला वाटत असतं की तो यांत्रिकपणे काम करीत नाही?

कृ: महाशय, यांत्रिकपणे चालणाऱ्या वस्तूला मानसिक दुःख होत नाही.

डे: नाही, ती फक्त काम करीत असते.

कृ: पण विचाराला मात्र मानसिक दुःख होतं.

डे: आणि विचाराजवळ मानसिक सुख असतं (सुख पाहिजे असतं).

कृ: होय, सुख, दुःख आणि बाकी इतर सर्व काही. आपण एकाच गोष्टीविषयी बोलुया. त्याला मानसिक दुःख होतं. त्याला मानसिक दुःख का होतं? प्रतिमा वगैरेमुळे होतं. त्याने प्रतिमा निर्माण केलेल्या असतात. आणि त्याने निर्माण केलेल्या गोष्टींमध्ये (प्रतिमांमध्ये) तो सुरक्षितता शोधत असतो. नाही का?

डे: होय. तशा प्रकारची सुरक्षितता शोधण्याची त्याने सुरुवातच का केली हे स्पष्ट होत नाही? जर त्याने एक तंत्र म्हणून सुरुवात केली, तर मग तिथे...

कृ: हे अगदी विलक्षण आहे, नाही का? विचाराला तो यांत्रिकपणे काम करतो हे का समजत नाही, त्याला असं का वाटतं की तो एखाद्या यंत्रापेक्षा निराळा आहे?

डे: त्याला असं वाटत असाव की त्याच्याकडे बुध्दी आणि भावना आहेत आणि तो एखाद्या यंत्राप्रमाणे नाही, तर एक जिवंत गोष्ट आहे.

कृ: मला वाटतं तेच त्याचं मूळ कारण असावं. त्याला वाटतं की तो जगत असतो. आणि म्हणून तो स्वतःला अयांत्रिक (जिवंत) अस्तित्वाचे गुणधर्म लावत असतो. विचार हुशार आहे, तो स्वतःला असे गुण लावून घेत असतो जे मूलतः त्याच्याजवळ नसतात. तो असं का करतो?

डे: तुम्ही असं म्हणत होता की विचाराला असं समजू शकतं की तो यांत्रिकपणे काम करतो. याचा अर्थ असा होतो की त्याच्याजवळ बुध्दी आहे.

कृ: होय. तो यांत्रिकपणे काम करतो हे विचाराला समजतयं? का ते पाहणारं दर्शन (perception) असतं?

डे: मग तुम्ही जे परवा म्हटलं होतं त्यात बदल झाला आहे असं वाटतं.

कृ: मी फक्त शोध घेत आहे.

डे: तो (विचार) तुकड्या तुकड्यांनी बनलेला आहे आणि मग हे तुकडे जोडले आहेत वगैरे. आता, जर तिथे दर्शन असेल की विचार यंत्रवत आहे तर मग ती प्रज्ञा त्या दर्शनामध्ये असते.

कृ: आपण असं म्हणतो आहोत का महाशय, की विचारामध्ये दर्शनाची स्वतःची अशी प्रज्ञा असते ज्याच्यामुळे तो स्वतःला यंत्रवत असल्याचं पाहतो.

डे: ते विचित्र वाटतं.

कृ: किंवा तिथे दर्शन असतं आणि ते दर्शन म्हणतं, दाखवतं की विचार यंत्रवत आहे.

डे: होय. आपण त्याला सत्य म्हणतो.

कृ: होय. परंतु तिथे दोन गोष्टी आहेत. एकतर विचाराकडे त्याची स्वतःची दर्शनाची दृष्टी असते, प्रज्ञेची दृष्टी असते आणि म्हणून त्याला जाणीव होते की तो यंत्रवत आहे किंवा तिथे दर्शन होतं जे सत्य असतं आणि ते दर्शन सांगतं की विचार यंत्रवत आहे.

डे: होय, परंतु पहिली कल्पना अंतर्विरोधी वाटते.

कृ: होय, ह्यामध्ये विचार खंडित का असतो याचं उत्तर मिळतं का?

डे: जर विचार यंत्रवत असेल, तर त्याला खंडितच असावं लागेल.

कृ: विचार समजू शकणार नाही का की तो यंत्रवत आहे?

डे: यापूर्वी तुम्ही म्हटलं आहे की (आपल्याला) विचाराच्या स्वरूपाचं जाणीवपूर्वक अवधान होतं आणि नंतर विचार व्यवस्थित होतो. (विचारामध्ये सुसूत्रता येते.)

कृ: (हे कसे ते समजण्यासाठी) आपण आता दुसऱ्या एका गोष्टीकडे मागे गेलं पाहिजे. ज्या गोष्टी जाणीवेमध्ये सामावलेल्या असतात त्या विचारानेच एकत्र केलेल्या असतात. जाणीवेचा संपूर्ण आशय ही विचाराची निर्मिती आहे. जाणीव म्हणजे विचारच असतो.

डे: होय. ती एक संपूर्ण प्रक्रिया आहे.

कृ: होय. विचार हे पाहतो का? का तिथे विचाराशिवाय विशुध्द दर्शन असतं जे नंतर म्हणतं की विचार यंत्रवत आहे.

डे: मग विचाराला आपण काय करावं हे कसं समजतं? आपण त्यादिवशी म्हणत होतो की ज्यावेळी सत्याचे दर्शन होतं...

कृ: (तेव्हा) कृती घडते.

डे: कृती घडते आणि विचाराला त्या कृतीची जाणीव होते.

कृ: होय, बरोबर.

डे: आता, त्या कृतीचं अवधान होत असताना विचार यंत्रवत असतो का?

कृ: नाही. मग विचार यंत्रवत नसतो.

डे: विचार आपले स्वरूप बदलतो हे सांगितलं पाहिजे. हाच मुद्दा आपण धरून ठेवला पाहिजे. विचाराला त्याचे निश्चित स्वरूप-गुणधर्म नसतात हाच मुद्दा आहे का?

कृ: होय, महाशय.

डे: मला वाटतं आपल्या बहुतांश चर्चेचा कल असा आहे की विचाराकडे निश्चित स्वरूप असतं, परंतु आता आपण म्हणत आहोत की विचार बदलू शकतो.

कृ: होय विचार नक्कीच बदलतो.

डे: होय. परंतु मला म्हणायचं आहे की तो (विचार) मूलभूतपणे बदलतो.

कृ: जरा थांबा. मला काहीतरी दिसतयं -- आपणा दोघांनाही काहीतरी नवीन दिसू लागलयं. आपण म्हणतो संपूर्ण दर्शन (आकलन) म्हणजे सत्य. ते दर्शन प्रत्यक्षातही कार्यरत असतं. तिथे दर्शन असतं जे सत्य असतं. आणि ते फक्त प्रत्यक्षातच कृती करू शकतं. पाहा महाशय, दुसऱ्या तऱ्हेने पाहा. मी संपूर्णपणे काहीतरी पाहतो जी विचाराची कृती नसते.

डे: होय. ती थेट कृती असते.

कृ: होय. ते थेट दर्शन असतं. ते दर्शन थेट कृती करतं.

डे: विचारा शिवाय.

कृ: तेच मला शोधून काढायचंय.

डे: होय. जेव्हा तिथे धोक्याचं दर्शन होतं, ते ताबडतोब कृती करतं, विचारा शिवाय.

कृ: ते बरोबर आहे. विचार त्यानंतर त्या कृतीविषयी सावध होतो, जागृत होतो आणि ते शब्दामध्ये व्यक्त करतो. म्हणजे तिथे संपूर्ण दर्शन होतं, जे सत्य असतं. ते दर्शन वास्तवतेच्या  क्षेत्रामध्ये कृती करतं. ती कृती विचाराची निर्मिती नसते. परंतु ती समग्रतेची कृती असल्यामुळे, विचारामध्ये बदल घडून आलेला असतो.

डे: तुम्ही म्हणता विचार समग्रतेचा (whole) एक विभाग आहे, समग्रतेमध्ये विचार सामावलेला आहे, आणि म्हणून तो बदललेला आहे. हेच तुम्ही म्हणत आहात का?

कृ: नाही. मी फक्त शोध घेत आहे. जेव्हा तो समग्रता पाहतो, (तेव्हा) ते सत्य असते.

डे: जे पूर्ण आहे त्याला दर्शनामुळे वेगळेपणा येतो.

कृ: ते तुकड्या-तुकड्यांमध्ये विभागले जात नाही.

डे: नाही. ते समग्र असते. परंतु निराळे.

कृ: होय. आणि ते (समग्र दर्शन) कृती करते. ती कृती विचाराची निष्पत्ती नसते, ती विचाराने एकत्र आणलेली कृती नसते. ते स्पष्ट आहे. मग विचाराचा त्या कृतीशी काय संबंध असतो?

डे: आपण अस म्हणू शकतो की विचार ही एक भौतिक प्रक्रिया असते, मेंदुच्या पेशीवर आधारित. आता दर्शनाची कृती मेंदुच्या पेशीवर कशाही परिस्थितीत परिणाम करणार, नाही का?

कृ: तोच तर मुद्दा आहे. ती परिणाम करते. अगदी बरोबर.

डे: आणि म्हणून विचार निराळा (झाला) असला पाहिजे.

कृ: अगदी बरोबर. म्हणजे महाशय, तुम्ही काहीतरी संपूर्णपणे पाहता, आणि मेंदूच्या कार्याचे जे स्वरूप असते ते संपूर्ण दर्शन त्या खंडित दर्शनापेक्षा निराळे असते. जेव्हा हे संपूर्ण दर्शन आणि कृती असते तेव्हा मेंदूच्या पेशींवर परिणाम होणारच.

डे: समजा, मेंदूच्या पेशीवर परिणाम झाल्यामुळे कदाचित ते विचाराचे स्वरूप बदलेल.

कृ: थांबा. ते अगदी सूक्ष्म आहे. तो धक्का (shock) असत्तो. ते मेंदूला काहीतरी पूर्णपणे नवीन असते.

डे: आणि म्हणून दर्शन मेंदूच्या शारीरिक रचनेमध्ये संपूर्णपणे आत शिरते - भेद करते.

कृ: होय. आपण त्याबाबत सरळ-साधं पाहुया. जर तुम्ही पाहिलं की (विचाराने केलेलं) हे खंडन, विभाजन हे प्रचंड धोकादायक आहे, जर तुम्ही खरोखर ते पाहिलं तर ते (दर्शन) तुमच्या संपूर्ण विचार करण्याच्या प्रक्रियेमध्ये परिणाम करीत नाही का?

डे: होय. आणि विचाराने हा परिणाम टाळण्यासाठी एक मार्ग शोधलेला आहे.

कृ: ते बरोबर आहे. तेच मला सांगायचं आहे. विचार त्याला विरोध करतो.

डे: परंतु का? यंत्र असा विरोध करणार नाही.

कृ: नाही. कारण ती (त्याची) सवय असते. तशा प्रकारे तो संस्कारित झालेला असतो. तो त्या चाकोरीमध्ये फिरत राहतो. आणि दर्शन घडून येतं आणि त्याला हलवतं. (धक्का देते.)

डे: होय. परंतु विचार स्वतःला सुस्थापित करतो, तो एका निश्चित स्थितीला धरून राहतो. जर आपण अशा प्रकारे त्याकडे पाहिलं, तर विचाराला निश्चित असा स्वभाव नसतो, तो यंत्रवत असेल किंवा प्रज्ञावान असेल.

कृ: नाही. मी विचाराला या क्षणी 'प्रज्ञावान' हा शब्द लावणार नाही.

डे: पूर्वी आपण म्हटलं आहे की विचाराला निश्चित असा स्वभाव नसेल आणि तो यंत्रवत असण्याची गरज नाही.

कृ: विचार चाकोरीमध्ये कार्यरत असतो, विचार सवयींमध्ये जगत असतो, स्मृतीमध्ये; आणि संपूर्ण दर्शन समग्र रचनेवर खचितच परिणाम करतं.

डे: ते बरोबर आहे. या दर्शनाचा परिणाम म्हणून विचार निराळा असतो.

कृ: होय. दर्शनामुळे विचार निराळा असतो - होतो.

डे: कारण हे दर्शन विचाराची शारीरिक रचना भेदून आत शिरलेलं आहे. परंतु आता आपल्याला त्याला प्रज्ञावान म्हणायचं नाही. असं म्हणूया की विचार जर यंत्रासारखा वागला तर तो समस्या निर्माण करणार नाही. तो फक्त काम करेल. विचार काही विक्षिप्त कारणासाठी यंत्रासारखा वागण्यापेक्षा काहीतरी निराळा वागण्याचा प्रयत्न करीत आहे.

कृ: होय. विचार यंत्रापेक्षा काही अधिक करण्याचा प्रयत्न करीत आहे.

डे: आता, तिथे दर्शन आणि अवधान आहे आणि विचारामध्ये त्याची नोंद झालेली असणे शक्य आहे. जर दर्शन मेंदुच्या शारीरिक रचनेमध्ये बदल करते तर कुठल्याना कुठल्या प्रकारे स्मृतीच्या आशयामध्ये त्या परिणामाची नोंद केली जाणार.

कृ: ते बरोबर आहे. एक मिनिट महाशय, मला जरा थोडसं मागे जायचंय. तुम्ही काहीतरी संपूर्णपणे पाहता. लोभाचं तुम्हाला पूर्णपणे दर्शन होतं - सध्या आपण ते उदाहरण घेउया - त्या संपूर्ण दर्शनामुळे तुमची कृती अयांत्रिक होते - यंत्रवत म्हणजे विचाराने लोभाच्या मागे धावणे.

डे: परंतु तिथे विचाराचा दुसरा भाग नसतो का, जो यंत्रवत काम करीत असतो परंतु जो आवश्यक असतो? उदाहरण म्हणजे विचारामध्ये सामावलेली माहिती.

कृ: जरा थांबा. मी त्याकडेच येतो आहे. तुम्ही लोभाची रचना आणि स्वरूप संपूर्णपणे पाहता आणि तुम्ही ते पाहत असल्यामुळे त्याचा (लोभाचा) अंत होतो. मग विचाराला इथे काय स्थान आहे?

डे: त्याला तरीसुध्दा यंत्रवत कार्य असते.

कृ: नाही. तो (लोभ) संपलेला असतो. तुम्ही लोभी राहत नाही.

डे: होय, परंतु त्यामध्ये लोभाशिवाय इतर गोष्टीसुध्दा असतात, जसा व्यवहारिक विचार

कृ: परंतु तुम्ही लोभी नसता. ती प्रतिक्रिया, ती हालचाल, ती यंत्रवत सवय संपलेली असते. मग विचाराला काय स्थान आहे?

डे: परंतु तुम्हाला जर कुठे जाण्याचा मार्ग शोधायचा असेल तर विचाराला काहीतरी स्थान असते.

कृ: कशासाठी? जेव्हा मला कोटाची जरुरी असते तेव्हा मी तो घेईन. परंतु तिथे लोभ नसतो.

डे: नाही. परंतु विचार लोभाबरोबर सारुप्य - एकरुप झालेला नाही. तुमच्या जवळ विचार असतो जो तार्किक असतो. लोभ हा अतार्किक विचार आहे.

कृ: होय, लोभ हा अतार्किक आहे.

डे: परंतु विचार तर्कशुध्दही असतो, उदाहरणार्थ, तुम्हाला काहीतरी शोधायचं असेल.

कृ: जेव्हा तुम्ही लोभाची समग्रता पाहता, तुमच्यामध्ये काहीतरी घडलेलं असतं.

डे: परंतु तुम्ही म्हणत आहात की तिथे विचार उरलेला नसतो.

कृ: विचार आवश्यक नसतो.

डे: तर मग तुम्ही तुमचा मार्ग कसा शोधणार? तुम्ही तुमची स्मृती कशी वापरणार?

कृ: असे पाहा, मी लोभी राहिलेलो नाही. मला दर्शनाच्या क्षेत्रामध्ये विचाराची गरज नाही. म्हणून विचार त्यामध्ये अजिबात शिरत नाही.

डे: दर्शनामध्ये नव्हे, परंतु तरीसुध्दा त्याला स्थान आहे, असं दिसतं.

कृ: मी म्हणतो आहे की लोभामध्ये त्याला स्थान नाही. जेव्हा तिथे संपूर्ण दर्शन असतं तेव्हा विचाराला स्थान नसतं.

डे: त्या दर्शनामध्ये.

कृ: केवळ त्या दर्शनामध्येच नव्हे तर त्यासंबंधी विचाराला मुळी अस्तित्वच उरत नाही. सगळ्या श्रध्दा अतार्किक आहेत हे तुम्ही पाहता, तिथे श्रध्देच्या संपूर्ण रचनेचं दर्शन होतं, आणि मग श्रध्देला तुमच्या विचारामध्ये, तुमच्या मेंदुमध्ये स्थान नसतं. मी जर श्रध्देची संपूर्ण रचना पाहिली तर ती श्रध्दा संपलेली असते. श्रध्दा नाहिशी झालेली असते.

मग विचाराने निर्माण केलेल्या गोष्टीमध्ये विचार येतोच कुठे? मी बरोबर व्यक्त करतो आहे की नाही हे मला माहिती नाही. असे पाहा, महाशय, मी पाहतोय -- सध्या मी ’मी’ हा शब्द वापरतोय -- मी भीती आणि श्रध्दा यांची

रचना पूर्णपणे पाहतो आणि बाकी इतर सर्व. ते संपूर्ण दर्शन असल्यामुळे श्रध्देला माझ्या विचारामध्ये, माझ्या मेंदूमध्ये अस्तित्व - स्थान नाही. आता, ह्यात विचार कुठे येतो?

डे: त्या स्तरावर, मुद्द्यावर येत नाही.

कृ: तो (विचार) संपलेला असतो. ज्यावेळी तिथे संपूर्ण दर्शन असतं त्यावेळी विचाराला तिथे स्थान नसतं. ज्यावेळी अन्नाची, कपड्याची किंवा निवाऱ्याची गरज असते तिथे विचार कृतीशील होतो. यावर तुम्हाला काय म्हणायचं आहे?

डे: होय, ते बरोबर असावं.

कृ: मला त्याला प्रश्न करायचा आहे, मला त्यामध्ये शिरायचं आहे.

डे: परंतु आपण चर्चेची सुरुवात केली आहे ती अशासाठी की विचाराने जे काय केलं आहे ते का केलं ते समजून घ्यावं म्हणून. दुसऱ्या शब्दात मांडायचं तर, जेव्हा तिथे संपूर्ण दर्शन असतं तेव्हा तिथे विचाराला स्थान नसतं. आता जेव्हा आपण व्यावाहारिक पातळीवर येतो, तेव्हा तुम्ही म्हणू शकता की तेव्हा आपल्याला संपूर्ण दर्शन होत नाही. परंतु जी माहिती गोळा केलेली असते त्यावर आपण अवलंबून असतो आणि म्हणून आपल्याला विचाराची गरज भासते.

कृ: त्या ठिकाणी हे बरोबर आहे. घर बांधण्यासाठी मला विचाराची आवश्यकता असते.

डे: आणि तुम्ही गोळा केलेल्या माहितीवर अवलंबून राहता. घर कसं बांधायचं हे मी थेट पाहू शकत नाही.

कृ: अगदी बरोबर.

डे: परंतु मानसिक गोष्टींबाबत...

कृ: जेव्हा तिथे संपूर्ण दर्शन असतं तेव्हा विचार मानसिक प्रक्रियेमध्ये शिरत नाही.

डे: होय. जरी ऐहिक दर्शनामध्ये त्याला स्थान असेल तरीही मानसिक दर्शनामध्ये त्याला स्थान नाही.

कृ: ते बरोबर आहे.

डे: परंतु तरीसुध्दा लोक नेहमीच विचारतील की विचाराचं कुठे चुकलं आहे, त्याने ह्या सर्व विक्षिप्त गोष्टी का केल्या आहेत? त्याला जिथे स्थान नसतं तिथे त्याने स्वतःला का घुसवलं आहे?

कृ: आपण असं म्हणू शकतो का की विचार संभ्रम निर्माण करतो?

डे: होय. पण तो ते का करतो, त्याला ते कशाला करायला पाहिजे? ते का घडतं?

कृ: कारण विचाराने दर्शनाची जागा घेतली आहे.

डे: परंतु त्याने ते का करावं?

कृ: विचाराने असं का गृहीत धरावं की तो समग्रता पाहतो?

डे: किंवा (असं का गृहीत धरावे की) त्याला काहीही पाहता येतं?

कृ: असं घडतं का, महाशय, की जेव्हा तिथे संपूर्ण दर्शन असतं, त्या दर्शनामध्ये विचाराची हालचाल नसते, काळ वगैरेची हालचाल, मन ज्यावेळी जरूर असते त्याचवेळी विचाराचा उपयोग करतं -- नाहीतर ते रीतं असतं.

डे: मला वाटतं आपण हे निराळ्या प्रकारे मांडून पाहूया. अशा प्रकारचं मन, जेव्हा ते विचाराचा उपयोग करतं, तेव्हा ते

जाणतं की तो विचार आहे, ते कधीच असं समजत नाही की तो विचार नाही. (ते जाणतं की तो विचार आहे, दर्शन नाही.)

कृ: ते बरोबर आहे. ते जाणतं की तो विचार आहे आणि दुसरं काही नाही.

डे: जर तो फक्त विचार असेल तर त्याला मर्यादित अर्थ असतो आणि आपण त्याला फार महत्व देण्याची गरज नाही.

कृ: ते बरोबर आहे.

डे: मला वाटतं धोका असा आहे की तिथे जे मन असतं त्याला समजत नाही की हा विचार आहे. एका स्तरावर यंत्रवत प्रक्रिया सुरू होते जी कशामुळेतरी मान्य करीत नाही किंवा जिला माहित नसतं की तो (विचार) यंत्राप्रमाणे काम करीत असतो.

कृ: होय. तुम्ही अस म्हणालं का की माणसाला अलिकडेपर्यंत समजलेलं नव्हतं की विचार ही भौतिक आणि रासायनिक प्रक्रिया असते, आणि म्हणून त्याला प्रचंड महत्त्व आले आहे?

डे: होय. हे निश्चितच सत्य आहे की अगदी अलिकडेच विज्ञानाने विचाराचं भौतिक तसंच रासायनिक गुणधर्म दाखवून दिले आहेत.

कृ: सवय, संस्कार यांच्यासाठी विचार ही जीवनामध्ये मुख्य (प्राथमिक) गोष्ट आहे. विचाराला कधीच समजलेलं नाही की तो मर्यादित आहे. हेच आपण म्हणत आहोत का?

डे: त्याचा तो एक भाग आहे. होय.

कृ: आणि आपण असंही म्हणत आहोत की जर तिथे समग्र दर्शन असेल तर विचारामध्ये बदल घडून येतो.

डे: मग विचाराचं काय होतं?

कृ: विचार यंत्रवत असल्यामुळे फक्त यंत्राप्रमाणेच कार्य करू शकतो. तिथे विचाराला उपयोग करता यावा अशी मानसिक गोष्ट नसते.

डे: हे थोडसं स्पष्ट करूया. असं म्हणुया की तिथे नवनिर्मिती होते, विचारामध्ये काहीतरी नवीनता येते, वास्तवतेच्या क्षेत्रामध्ये नावीन्य येते, पण आपण म्हणतो की ते कदाचित दर्शन असेल.

कृ: मला वाटत ते दर्शनच असतं. अर्थातच.

डे: दर्शन घडल्यामुळे विचार निराळा झालेला असतो. परंतु तो यंत्रवतच राहतो.

कृ: ते बरोबर आहे. तेच तर आपण म्हणत आहोत.

डे: त्या दर्शनामुळे तो (विचार) त्याच्या कृतीचा प्राधान्यक्रम (घडणावळ) बदलतो आणि म्हणून सर्जनशीलता ही विचारामध्ये नसून ती दर्शनामध्ये असते.

कृ: याचा अर्थ विचाराने 'मी' निर्माण केला आणि नंतर तो 'मी' विचारापासून स्वतंत्र झाला आणि तरीही 'मी' हा विचाराचाच एक भाग असल्यामुळे ती एक मानसिक रचनाच असते. आणि ज्यावेळी 'मी' नसतो त्याचवेळी दर्शन घडू शकतं.

डे: हा 'मी', जी काल्पनिक रचना असते, ती एकाअर्थी खरीसुध्दा असते. परंतु या 'मी' मध्ये काहीतरी केंद्र अंतर्भूत असतं, नाही का?

कृ: होय, अर्थातच. म्हणून तिथे केंद्र असतं. ते केंद्र विचारापासून स्वतंत्र असतं का?

डे: असं वाटतं की ते केंद्र म्हणजे विचारच असतो.

कृ: ते बरोबर आहे. म्हणूनच तर ते विभाजित असतं.

डे: आता तुम्ही म्हणत होता की आपण केंद्रामधून विचार करत असल्यामुळे तिथे विभाजन होत असतं.

कृ: तसं असलंच पाहिजे. असं पाहा, आपण केंद्रामधूनच कृती करत असतो हे विभाजनाचे मूळ कारण आहे.

डे: आपल्याला वाटतं की आपण मानसिकदृष्ट्या केंद्रामधूनच कृती करतो. भौतिकदृष्ट्या (शारीरिकदृष्ट्या) आपल्याला केंद्रामधूनच कृती करावी लागते कारण आपलं शरीर हे आपल्या दर्शनाक्षेत्राचं केंद्र असतं. मानसिकदृष्ट्या आपण त्याची (केंद्राची) प्रतिमा तयार करतो. आपल्याजवळ केंद्राचा विचार असतो. तो आकृतीबंध आपल्याला भौतिकदृष्ट्या उपयोगी असतो. परंतु नंतर त्याने मानसिकदृष्ट्यापण आपल्या जाणीवेमध्ये प्रवेश केला.

कृ: बरोबर. म्हणून विचार हा विभाजित - खंडित असतो.

डे: असा विचार असतो का की जो केंद्रामधून कृती करत नाही? का त्याला नेहमीच तशीच कृती केली पाहिजे?

कृ: तशीच कृती करावी लागते. कारण विचार म्हणजे केंद्रामधून येणारी स्मृती असते.

डे: याचा पुढे शोध घेऊया. विचार केंद्रामधूनच का यायला पाहिजे, स्मृती केंद्राशिवाय का असू नये? तिथे फक्त स्मृती का असू शकत नाही, केवळ माहिती का असू शकत नाही हे मला ते स्पष्ट होत नाही.

कृ: तिथे माहिती असू शकते.

डे: त्याला केंद्राची जरूरी आहे का?

कृ: जर ती केवळ माहिती असेल तर त्याला केंद्र कशासाठी पाहिजे?

डे: विचाराने केंद्र का निर्माण करावे हे मला स्पष्ट होत नाही. आपल्याला माहित होतं की तिथे केंद्र आहे. परंतु मानसिकदृष्ट्या आपण केंद्राला इतक महत्त्व का देतो?

कृ: कारण विचार तो स्वतःला यंत्राप्रमाणे आहे हे मान्य करत नाही.

डे: विचार तो यंत्रवत आहे हे मान्य करण्यास असमर्थ ठरला आहे. त्याला केंद्राची आवश्यकता का वाटावी? विचार फक्त केंद्र निर्माण करीत नाही, परंतु केंद्राची कल्पना तिथे फक्त व्यावहारिक हेतूसाठी होती. परंतु विचाराने ती कल्पना स्वतःसाठी मानसिकदृष्ट्या वापरली.

कृ: होय

डे: आता तो ते का करीत होता?

कृ: अगदी साध्या कारणासाठी, विचार म्हणाला: 'मी यंत्रवत असू शकत नाही. मी त्यापेक्षा बरंच काहीतरी मोठं असलं पाहिजे'.

डे: मग, केंद्र त्याला मोठं कसं करत?

कृ: कारण (केंद्राने बनवलेलं) 'मी'पण त्याला चिरंतनत्व देतं.

डे: आपण हे अधिक स्पष्ट केलं पाहिजे की केंद्राने (स्वतःला) हे चिरंतनत्व बहाल करणं हा एक प्रकारचा खोटेपणा आहे.

कृ: हा मायक्रोफोन विचाराने बनवलेला आहे. तो 'शाश्वत' आहे. 'शाश्वत' अवतरणामध्ये.

डे: सापेक्षतेने शाश्वत, होय.

कृ: आणि शिवाय विचाराने एक चिरंतन गोष्ट म्हणून 'मी' निर्माण केला आहे.

डे: होय. विचाराने केंद्राची चिरंतनत्वासाठी का निवड केली?

कृ: कदाचित सूर्याच्या चिरंतनत्वामुळे त्याने निवड केली असेल, जे या विश्वाचे केंद्र आहे. आणि जर तिथे केंद्र असेल, तुम्ही म्हटल्याप्रमाणे, तर ते सगळ्या गोष्टी जोडून टाकत असतं.

डे: होय, ते एकात्मता देत असतं.

कृ: एकात्मता, कुटुंब वगैरे वगैरे. परंतु जेव्हा तिथे पूर्ण दर्शन असतं तेव्हा ते केंद्र अनावश्यक असतं.

डे: जेव्हा पूर्ण दर्शन नसतं तेव्हा ते (केंद्र) आवश्यक असतं असं तुम्ही म्हणता का?

कृ: त्याची आवश्यकता नसते. परंतु तेच घडत असतं.

डे: स्वतःचा यांत्रिकपणा न समजू शकल्यामुळे विचार त्याने स्वतः निर्माण केलेल्या वस्तू जिवंत आहेत असं समजायला लागतो.

कृ: ते बरोबर आहे.

डे: आणि त्यांची (विचारांची) अस्थिरता, अनित्यता पाहून तो (विचार) काहीतरी चिरंतन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो आणि त्याला हे करण्याच्या प्रयत्नामध्ये केंद्र उपयुक्त वाटतं. ती एक प्रतिमा असते ज्याच्या भोवती सगळं एकत्र करता येतं - ठेवता येतं. म्हणून प्रत्येक गोष्ट दुभंगली जात आहे. विचाराला एकटं सोडलं तर तो विभागला जातो - जर तुम्ही एक केंद्र प्रस्थापित केलंत तर ते सगळ्यांना एकत्र पकडून ठेवतं.

कृ: ते बरोबर आहे महाशय. तेव्हा ज्यावेळी तुम्ही काहीतरी पूर्णपणे पाहता तेव्हा केंद्र असत नाही. आणि तरीसुध्दा, ते (दर्शन) काहीतरी आत आणत नाही का? जेव्हा तुम्ही काहीतरी पाहता, त्यामध्ये सर्वकाही सामावलेले नसतं का? हीच (दर्शन) सर्वात मूलभूत गोष्ट नाही का जी सगळ्या गोष्टींना धारण करते, एकसंध करते?

डे: दर्शन?

कृ: दर्शन.

डे: कृती.

कृ: कृती घडते (जी) "हे (केंद्राभोवती विणलेलं जग) खोटं आहे" (ह्या दर्शनातून आलेली असते).

डे: ठीक आहे. काहीतरी निराळ्या पध्दतीने मांडुया. की दर्शनाची कृती, तुम्हाला जे काय माहीत आहे ते सर्वकाही

एकत्र आणते आणि विचार त्याचं अनुकरण करतो - कसे? तर विचार एक केंद्र तयार करतो जे (दर्शनातील) प्रत्येक गोष्टीला एकत्र आणते आणि तो (विचार) त्या केंद्राला दर्शन झाल्याचा आभास निर्माण करतो.

कृ: ते बरोबर आहे. निरीक्षक, वगैरे (चा आभास निर्माण करतो).

डे: आणि विचारकर्तासुध्दा (असल्याचा आभास निर्माण करतो). विचार स्वतःच्या उगमाचं श्रेयही केंद्राला देतो आणि म्हणून विचार आपण सत्य जाणले असे मानतो.

कृ: ते बरोबर आहे.

डे: आणि म्हणून जीवन इ. इ. चे श्रेय विचार स्वतःला देतो.

कृ: महाशय, तिथे लोभ, भय, इ. चे दर्शन होतं का की तिथे संपूर्ण दर्शन असतं, ज्यामध्ये सर्व काही सामावलेले असतं? तुम्हाला समजतय का?

डे: होय.

कृ: म्हणून ते लोभाचं दर्शन, श्रध्देचं दर्शन, संघटित धर्माचं दर्शन असं नसतं.

डे: अस म्हणूया की तिथे 'जे आहे' त्याचं दर्शन होतं.

कृ: होय. तिथे फक्त दर्शन असतं.

डे: आता एक प्रश्न उरतो तो स्पष्ट केला पाहिजे. तुम्ही म्हणालात की सत्य म्हणजे 'जे आहे' ते.

कृ: होय. तिथे फक्त दर्शन असतं, दर्शन घेणारा नसतो.

डे: तिथे दर्शन घेणारा नसतो, परंतु दर्शन म्हणजे सुध्दा जे आहे ते, नाही का?

कृ: होय आणि दर्शक म्हणजेच केंद्र.

डे: होय. विचार त्या केंद्राला दर्शकाचे गुणधर्म चिकटवतो, तसेच विचार कर्त्याचे आणि कृती करणाऱ्याचे (गुणधर्म चिकटवतो).

कृ: इतर सर्व काही. अनुभव घेणारा वगैरे (सुध्दा चिकटवतो).

डे: जेव्हा विचाराने केंद्राची निर्मिती केली, तेव्हा त्याने त्या केंद्राला अनेक गुणधर्म बहाल केले, जसे विचार करणे, भावना.

कृ: ते बरोबर आहे महाशय.

डे: आणि जर तिथे सुख किंवा वेदना असतील तर त्या सुध्दा तो (विचार) केंद्राकडे निर्देशित करतो. अशा तऱ्हेने ते केंद्र जिवंत बनते. तुम्ही असं म्हणू शकाल का की वेदना केंद्राला होत आहेत असं मानल्यामुळे दुःख निर्माण होते?

कृ: अर्थातच. जोपर्यंत तिथे केंद्र आहे तोपर्यंत तिथे व्यथा, दुःख असलंच पाहिजे.

डे: जेव्हा तिथे केंद्र नसतं, तेव्हा वेदना ह्या फक्त विचारांमध्येच असतात.

कृ: केवळ शारीरिक (असतात).

डे: एकतर ती (वेदना) शारीरिक असेल किंवा ती (वेदनेची) स्मृती असेल -- म्हणजे खरोखरची नाहीच.

कृ: होय. म्हणजे काहीच नाही.

डे: परंतु वेदनेची (किंवा दुःखाची) स्मृती (चाळवली गेल्यावर) ती केंद्राला होत आहे असं मानलं जातं तेव्हा ती वेदना खरी होते (आता होते आहे असं वाटतं), पर्यायाने ती काहीतरी मोठं होऊ शकतं.

कृ: आता आपल्याला काहीतरी दिसायला लागलं आहे. म्हणजे जर तिथे पूर्ण दर्शन असेल, तर विचाराला त्यामध्ये स्थान नाही.

डे: आणि ते दर्शन कृती करतं आणि विचाराला त्या कृतीमध्ये स्थान असू शकेल. तेच आपण परवा म्हणत होतो.

कृ: होय. आता हे स्पष्ट करूया. पूर्ण दर्शन असतं - त्यामध्ये विचार नसतो आणि ते दर्शन म्हणजेच कृती असते.

डे: होय आणि ते (दर्शन) विचाराची गुणवत्ता बदलतं. जसं ते मेंदूच्या पेशी बदलत असतं.

कृ: विचाराला फक्त यंत्रवत काम असतं.

डे: यंत्रवत म्हणजे आपल्याला म्हणायचंय प्रज्ञायुक्त नाही असं, ते सर्जनशील नसतं. ते प्रज्ञाशील नसतं.

कृ: म्हणून जर विचार केवळ यंत्रवत असेल, तर तो कुठच्याही मानसिक केंद्राशिवाय प्रत्येक गोष्टीमध्ये यंत्रवत कृती करू शकेल. मग तिथे समस्या नसते.

डे: मला वाटतं सुरुवातीपासूनच विचाराने स्वतःला काहीतरी जिवंत, सर्जनशील असल्याचा समज करून घेतला, आणि मग तो (जिवंतपणा) चिरंतन करण्यासाठी केंद्राची निर्मिती केली.

कृ: अगदी बरोबर. म्हणून विचार का विभाजित असतो हे आता आपण पाहिल.

डे: तो विभाजित का असतो?

कृ: केंद्रामुळे. विचाराने केंद्र निर्माण केलं, एक शाश्वत अवस्था असावी म्हणून, आणि ते केंद्र म्हणजे सगळ एकत्र आणणारी एकजिनसी गोष्ट बनली.

डे: होय. संपूर्ण जग ते केंद्र एकत्र धरून ठेवते. कारण जर एखाद्याला आपलं केंद्र जातं असं वाटलं तर त्याला त्याचं सगळ जग लयाला जातं असं वाटतं.

कृ: ते बरोबर आहे.

डे: तेव्हा केंद्र म्हणजेच जग असतं.

कृ: ते बरोबर आहे. म्हणून विचार विभाजित असतो.

डे: तो का विभाजित असतो ते हे स्पष्ट करीत नाही.

कृ: कारण त्याने जे निर्माण केलं आहे त्यापासून स्वतःला निराळ केलं आहे.

डे: तोच तर मुद्दा आहे. तेव्हा ते आता अगदी स्पष्ट करुया. त्याने (विचाराने) स्वतःपासून वेगळ्या अशा स्वतःच्या केंद्राची निर्मिती केली. मात्र प्रत्यक्षात त्यानेच केंद्र निर्माण केलं आणि तोच केंद्र आहे.

कृ: तोच केंद्र आहे.

डे: परंतु तो केंद्राला जिवंत, खरोखर वास्तव वगैरे असल्याचे गुणधर्म चिकटवतो आणि तेच विभाजन असतं.

कृ: तीच मूळ गोष्ट - कारण आहे.

डे: येथून जीवनातील इतर विभाजनाची आवश्यकता सुरू होते. कारण ते दोन (केंद्र आणि विचार) निराळे आहेत हे टिकवण्यासाठी विचाराला प्रत्येक गोष्ट तोडावी लागते - त्या चौकटीमध्ये बसवण्यासाठी. आणि तिथे गोंधळाची सुरूवात होते. कारण एकतर तो ज्या गोष्टी निराळ्या नसतात त्यांना तो निराळ्या - अलग-अलग करतो किंवा ज्या गोष्टी निराळ्या असतात त्या एकत्र आणतो. केंद्र विचारापासून निराळं आहे हा भास टिकवण्यासाठी सर्वकाही त्या चौकटीत बसवलं जातं.

कृ: सगळं अस्तित्व त्या केंद्रामध्ये बसवण्यासाठी आखणी केली जाते.

डे: उदाहरणार्थ जर एखाद्याने एखाद्या विशिष्ट राष्ट्राला त्या केंद्राशी निगडीत केलं तर मग दुसरं राष्ट्र या केंद्राशी निगडीत नाही असा फरक करावा लागतो. म्हणून हे केंद्र एकत्र ठेवण्यासाठी - एकसंघ राहण्यासाठी (विचार) मानवामध्ये भेद निर्माण करतो. म्हणून संपूर्ण जग अनिश्चितपणे दुभंगलेलं आहे - तुकड्या तुकड्यांमध्ये विभागलेलं आहे.

कृ: मला काहीतरी दुसऱ्या विषयाकडे वळायचं आहे. मी जर श्रध्देचं स्वरूप पाहिलं, तर ते संपून जातं. जेव्हा तिथे भीतीचं संपूर्ण दर्शन असतं, तेव्हा ती संपलेली असते आणि जेव्हा लोभाचं संपूर्ण दर्शन होतं, तेव्हा तो संपलेला असतो. ते दर्शन एका गोष्टीच्या मागोमाग दुसऱ्या गोष्टीचं असतं की त्या समग्रतेचं संपूर्ण दर्शन असतं?

डे: जर तिथे समग्रतेचे संपूर्ण दर्शन असेल, तर मग करण्यासारखं तिथे काय उरतं?

कृ: तेच तर मला शोधून काढायचयं. दर्शन समग्र असतं का? आणि म्हणून ते संपूर्ण क्षेत्र स्वच्छ करतं -- सगळ्या जाणीवांना स्पर्श करतं?

डे: मग करण्यासारख तिकडे काय उरत?

कृ: थांबा. ते तसं आहे का ते आपण पाहुया. तेव्हा त्याला (दर्शनाला) लोभ, श्रध्दा, भीती, सुख या सर्वांमधून जाण्याची जरूरी नाही. त्याने हे सर्व संपवलेलं आहे.

डे: तुम्हाला असं म्हणायच आहे का की माणूस विचाराचे संपूर्ण स्वरूप पाहू शकतो, का त्याच्या पलिकडे काहीतरी (म्हणायचे) आहे?

कृ: त्याच्या पलिकडे, थोडसं अधिक. दर्शन विचाराचे स्वरूप पाहतं आणि ते विचाराचे स्वरूप पाहिल्यामुळे ते सगळे भेद पाहतं.

डे: होय. मला ते समजतंय. ते एक प्रश्न पुढे आणतंय, जो मला काही काळापासून विचारावासा वाटतोय. "परंपरा आणि परिवर्तन" या पुस्तकामध्ये तुम्ही 'सारतत्त्वा' च्या (essence) कल्पनेचा उल्लेख केला आहे - असं म्हटलं आहे की दर्शन सारतत्त्व शुध्द करतं. तुम्हाला ते आठवतंय का?

कृ: नाही. क्षमा करा. मला आठवत नाही.

डे: एक प्रकारे तिथे असा एक समज दिसला की तिथे दर्शन असतं -- संपूर्ण दर्शन म्हणजे प्रज्ञा -- आणि त्यामधून

तुम्ही ज्याला सारतत्त्व म्हणता ते येतं -- ते एखाद्या फुलासारखं उमलतं.

कृ: होय.

डे: आता, ते सारतत्त्व समग्रतेच्या दर्शनासारखं असतं का?

कृ: अर्थातच. तेच तर हे आहे. आता थांबा, मला ते स्पष्ट करू दे. तुम्ही अस म्हणाल का की तिथे भीती, लोभ, द्वेष, श्रध्दा यांचं (प्रत्येकाचं) दर्शन नसून जे काही विचाराने एकत्र आणलेलं आहे, आणि जे केंद्र आहे, त्या सगळ्याचं एकदम दर्शन असतं का?

डे: ठीक आहे. ते संपूर्ण दर्शन असतं. काहीवेळा लोक एक वाक्प्रचार वापरतात: 'सारतत्त्व आणि समग्रता'

कृ: सारतत्त्व आणि समग्रतेचं दर्शन होणं.

डे: ते योग्य वाटतं का?

कृ: सारतत्त्व (essence) ह्या शब्दाबद्दल मी साशंक आहे.

डे: तेव्हा असं म्हणूया की तुम्ही समग्रता पाहता.

कृ: सारतत्त्व हा शब्द सध्या बाजूला ठेऊया. तिथे लोभ, द्वेष, बाकी सर्वांचे अंशतः पाहणं नसतं. ते समग्र दर्शन असतं. आणि म्हणून समग्र दर्शन म्हणजे विचाराने ज्या सगळ्या गोष्टी एकत्र केलेल्या आहेत त्यांचं दर्शन, आणि त्याने स्वतःचं एक निराळे केंद्र तयार केलं (त्याचं दर्शन).

डे: आता आपल्याला ते अधिक स्पष्ट केलं पाहिजे कारण समग्र याचा अर्थ ह्या सर्व गोष्टी असा असेल किंवा त्याचा अर्थ दुसरा सुध्दा काहीतरी असेल.

कृ: मी त्याचा अर्थ दुसरा काहीतरी करतो. समग्र दर्शन म्हणजे विचार स्वतःला काही विशिष्ट गुणधर्म चिकटवतो ते पाहणं, विचार केंद्र निर्माण करतो ते पाहणं, आणि त्या केंद्राला काही मूल्ये देतो ते पाहणं आणि या मानसिक केंद्रामधून ज्या सर्व गोष्टी निर्माण होतात ते पाहणं.

डे: ती समग्र रचना झाली. त्यालाच आपण बऱ्याचदा सारतत्त्व (essence) म्हणतो. मूलभूत रचना.

कृ: होय. जर तुम्ही त्याला सारतत्त्व म्हणत असाल तर मला मान्य आहे.

डे: आणि ती रचना वैश्विक आहे. तुम्ही मान्य कराल का की तो फक्त हा विचार किंवा तो विचार नसतो, ही समस्या किंवा ती समस्या नसते.

कृ: ते वैश्विक आहे, होय. आता अशाप्रकारचे दर्शन शक्य आहे का? तुम्ही म्हणाल ते शक्य आहे -- दुसरं काही नाही. तुम्ही मला कारण सांगता, म्हणून मी ते पाहतो, मला ते जाणवतं, तुम्ही जे म्हणता त्यातील सत्य मी पाहतो. तुम्ही जे म्हणत आहात ते सत्य आहे. ते माझं किंवा तुमचं नाही. ते सत्य आहे.

डे: जर तुम्ही म्हणता ते सत्य आहे, तर मग ते 'जे आहे' ते आहे.

कृ: जे प्रत्यक्ष आहे.

डे: होय. परंतु ते दोन्ही आहे. मी ते अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो आहे. जेव्हा आपण म्हणतो, 'ते सत्य

आहे' आणि तिथे प्रत्यक्षता आहे - ज्या प्रकारे आपण 'प्रत्यक्ष' या शब्दाचा सामान्यपणे उपयोग करतो तोच अर्थ व्यक्ती (individual) ह्या शब्दाला वापरणे खऱ्या अर्थाने योग्य आहे. मला असं वाटतं प्रत्यक्षता म्हणजेच व्यक्ती, ती (व्यक्ती) अविभाज्य (indivisible) असते.

कृ: होय. व्यक्ती, अविभाज्य (हे सारखेच).

डे: प्रत्यक्षता ही अविभाज्य असते. परंतु प्रत्यक्षतेचा एक क्षण असतो किंवा प्रत्यक्षतेचा दुसरा क्षण असतो इ. इ. परंतु जेव्हा आपण सारतत्त्व पाहतो किंवा जेव्हा आपण समग्रता पाहतो किंवा वैश्विकता पाहतो तेव्हा त्यामध्ये सर्व काही सामावलेलं असतं.

कृ: ते बरोबर आहे.

डे: तेव्हा सत्य हे व्यक्तीच्या पलिकडे जातं, प्रत्यक्ष वस्तुस्थिती (च्या पलिकडे जातं) कारण ते समग्रता पाहतं. जे वैश्विक आणि आवश्यक आहे ते पाहतं, विचाराच्या स्वरुपाची समग्रता पाहतं. म्हणजे विचाराचं प्रत्येक उदाहरण त्यामध्ये असतं (त्या पाहण्यामध्ये सामावलेले असते).

कृ: ते बरोबर आहे. जेव्हा ते पाहिलं जातं तेव्हा विचार हा केवळ यंत्रवत असतो.

डे: तेव्हा विचार मान्य करतो की तो यंत्रवत आहे.

कृ: नाही. विचाराला ते मान्य करण्याची जरूरी नाही. तो यंत्रवतच आहे.

डे: होय. विचार बदललेला असतो. असा की तो यंत्रवत आहे आणि तो स्वतःला यंत्रवत नसल्याचा समजण्याचं थांबवतो. मला आता असं जाणवतय की जर मनुष्याचं या संस्कारित अस्तित्वापासून परिवर्तन करायचं असेल आणि जर तो जन्मजात संस्कारित असेल तर त्यातून बाहेर पडण्याचा त्याच्याजवळ कुठलाही मार्ग नाही. म्हणून एकच मार्ग दिसतो की संस्कारीत झालेला नसेल असा मनुष्य अस्तित्त्वात आला पाहिजे.

कृ: होय, पुढे चला, होय.

डे: म्हणून जर अशी व्यक्ती असेल, ती व्यक्ती कोण आहे याला फारसं महत्त्व नाही.

कृ: होय.

डे: तो वैश्विक व्यवस्थेचा फक्त एक भाग असतो. जर तुम्ही चर्चेसाठीच वादविवाद केला, तर तुम्ही कदाचित म्हणू शकाल की मानवता अशा एका टप्प्यापर्यंत येऊन पोचली आहे जिथे आता परिवर्तनासाठी ती तयार आहे.

कृ: होय. तेच तर ते म्हणताहेत.

डे: पुष्कळ लोकांनी तसं म्हटलयं. परंतु तुम्ही संस्कारित अवस्थेपासून बदलू शकत नसल्यामुळे, त्याची आवश्यकता असेल...

कृ: तिथे एक उत्प्रेरक (catalyst) असला पाहिजे.

डे: एक असंस्कारीत केंद्रस्थान... अशी ही कल्पना मला सुचली आहे.

कृ: थोडं मागे जाऊन बघितलं तर... विचाराच्या स्वरूपाचं आणि त्याच्या सर्व हालचालींचं समग्र दर्शन म्हणजेच

जाणीवेच्या संपूर्ण आशयाचं दर्शन असतं. आशय जाणीव तयार करतं आणि बाकी इतर सर्व काही, तेच केंद्र बनून राहतं. समग्र दर्शन त्याचवेळी घडतं जेव्हा केंद्र असत नाही; मग जाणीव पूर्णपणे निराळी असली पाहिजे.

डे: होय, मग तुम्ही तिच्या (जाणीवेच्या) स्वरूपाविषयी काय म्हणाल?

कृ: तिच स्वरूप काय असेल? असे पाहा महाशय, तुम्ही दाखविल्याप्रमाणे केंद्र हा एकत्रीकरणाचा एक मार्ग (factor) आहे.

डे: याच मार्गाने लोकांनी नेहमी एकत्र करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कृ: परंतु ते कधीच यशस्वी झालेलं नाही. ज्यावेळी केंद्र नसतं, म्हणजे जे विचाराच्या समग्रतेचं दर्शन असतं आणि म्हणून केंद्र नसतं -- (त्यावेळी होणारी) जाणीव काहीतरी अगदी निराळी असली पाहिजे.

डे: परंतु जाणीव ह्या शब्दामध्ये सामान्यतः विचार ह्या कल्पनेचा समावेश असतो. विचार (दर्शनानंतरही) चालू राहतो का?

कृ: जर विचार नसेल तर तिथे जाणीव असू शकणार नाही.

डे: तुम्ही जाणीव कशाला म्हणता?

कृ: म्हणून मी म्हणालो की ती (जाणीव) संपूर्णपणे निराळी असली पाहिजे. जी जाणीव आपल्यापाशी आहे ती केंद्रासह असलेली जाणीव आहे, तिच्या सर्व आशयासह, सर्व विचारासह, त्या सर्व हालचाली धरून, आणि जेव्हा याचं संपूर्ण दर्शन होतं तेव्हा ती (केंद्रनिर्मित जाणीव) नसते.

डे: केंद्र नसतं. आणि सगळी व्यवस्था निराळी असते. होय. आणि तुम्ही असंही म्हटलं आहे की त्या (दर्शना) मध्ये मेंदूच्या पेशी वेगळ्या प्रकारे काम करत असतील.

कृ: मला असं वाटतं.

डे: किंवा कदाचित मेंदूच्या निराळ्या पेशी काम करत असतील?

कृ: मला माहीत नाही. मला वाटतं त्या वेगळ्या प्रकारे काम करत असतील.

महाशय, करुणा म्हणजे काय? केंद्र करुणा असण्यासाठी सक्षम असतं का?

डे: ठीक आहे. मी म्हणेन की केंद्र खऱ्या अर्थाने कोणत्याही गोष्टीसाठी सक्षम नसतं.

कृ: नाही. केंद्र स्वतःला करुणेचा गुण लावून घेऊ शकेल का?

डे: अर्थातच ते तसं करू शकतं.

कृ: ते करू शकतं. होय, ईश्वर म्हणून, दुसर काहीही (ते स्वतःला लावून घेऊ शकतं). परंतु जर तिथे कोणत्याही प्रकारचा गुणधर्म नसेल तर मग करुणा म्हणजे काय? संपूर्ण दर्शन म्हणजे करुणा असते का?

डे: होय. ती असलीच पाहिजे, सर्वांसाठी प्रेम भावना असणं.

कृ: मला वाटतं संपूर्ण दर्शनाचा एक गुणधर्म म्हणजे करुणा असणं.

डे: असं पाहा. केंद्राला फक्त अशाच भावना असू शकतात ज्याचे गुणधर्म त्याला चिकटवलेले असतात. म्हणून

ज्याच्याशी त्या केंद्राचं सारुप्य (identification) असेल (ज्या गोष्टी केंद्राने आपल्या मानलेल्या असतील) त्याबद्दल त्याला (केंद्राला) करुणा असेल.

कृ: अर्थातच. मी तुमच्यावर प्रेम करतो. आणि मी दुसऱ्यावर प्रेम करत नाही. किंवा मी दुसऱ्यावर प्रेम करतो पण मी तुमच्यावर प्रेम करीत नाही.

डे: मला आकलन झालेलं नसेल आणि म्हणून त्याला काहीही अर्थ नसेल.

कृ: हा फार विलक्षण कुतुहलाचा विषय आहे. ज्यांची मनं स्वप्नाळू, कल्पनाविलासाने, लैंगिक समस्यांनी भरली आहेत अशा भयग्रस्थ माणसांना तुम्ही हे कसं सांगणार? तुम्ही त्याला काहीही सांगा, तो ऐकणार नाही. आपल्याला त्यामध्ये शिरण्यासाठी इथे निवांत वेळ आहे . आणि आपल्याला शोध घ्यायचा आहे कारण आपण स्वतःविषयी वस्तुनिष्ठ आहोत.

मला वाटत अशाच ठिकाणी करुणा येत असावी - करुणा प्रकट होत असावी.

- Gstaad, 25 July 1975

# शब्दसूची

belief - श्रध्दा

catalyst - उत्प्रेरक

consciousness - जाणीव

compassion - करुणा

content of consciousness - जाणीवेचा आशय

creative - सर्जनशील

essence - सारतत्त्व

fragmented - विभाजित, खंडित, तुकड्या तुकड्यांनी बनलेले

image - प्रतिमा

indivisible - अविभाज्यता

intelligence - प्रज्ञा

irrational - अतार्किक

mechanical - यांत्रिक

order - प्राधान्यक्रम, घडणावळ

pain - वेदना

perception - दर्शन

perishable (imperishable) - शाश्वत (अशाश्वत)

permanent - चिरंतनत्त्व

pleasure - सुख

reflection - प्रतिसाद

suffering - दुःख

totality - समग्रता

unconditioned - असंस्कारीत

whole - समग्र